# विद्यार्थीनींचे प्रेरणास्थान प्राचार्या समिक्षा निकम



शिक्षक या तीन शब्दात खूप मोठा अर्थ सामावला आहे. शिक्षकाला मातीची भांडी घडविणाऱ्या कलाकाराची भूमिका निभावताना विद्यार्थ्यांवर सुसंस्कार, नीतिमूल्य, सकारात्मक जीवनदृष्टी यांची सुंदर नक्षी उमटवायची असते. सातारा येथील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन ऑफ वुमेन सातारा येथील प्राचार्या डॉ. समिक्षा निकम या अनेक विद्यार्थीनींच्या आयुष्यात साक्षरतेची, संस्काराची, सक्षमीकरणाची आणि स्वावलंबनाची मूल्य रूजवत आहेत.

डॉ. समिक्षा निकम यांचा जन्म साताऱ्यात झाला. बालपण अगदी लाडात गेलं. त्याचं आठवीपर्यंतचं शिक्षण ठाणे जिल्ह्यातील भातसानगर या आदीवासी भागात झालं. तसचं पुढील शिक्षण पुणे, मुंबई, सातारा या ठिकाणी झालं. त्या इलेक्ट्रिकल इंजिनियर असून त्यांनी एम. फिल, पी.एच.डी पदवी संपादन केली आहे. सुरूवातीला त्या २००० साली कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन ऑफ वुमेन सातारा येथे प्राध्यापक म्हणून रूजू झाल्या. त्यानंतर २००१ साली त्यांची शिकवण्याची पद्धत, शिक्षण क्षेत्रातील कामाप्रती असलेली निष्ठा पाहून त्यांच्याकडे कॉलेजच्या प्राचार्या पदाची धुरा सांभाळण्यास दिली गेली. माहेर आणि सासरच्या मंडळींची उत्तम साथ, थोरा मोठ्यांचा आशिर्वाद, मार्गदर्शन, त्याचबरोबर पती विवेक निकम यांची प्रत्येक कार्यात असलेली खंबीर साथ यामुळे काम करत असताना कायमचं नवी उमेद मिळत असल्याचे त्या सांगतात.

शिक्षण क्षेत्रात काम करत असताना त्या अनेक उपक्रम विद्यार्थीनींसाठी राबवत असतात. आई वडिलांनंतर विद्यार्थी हा शिक्षकांचे निरीक्षण करतात आणि निकम मॅडमचा उत्साह हा नेहमी विद्यार्थीनींना मार्गदर्शक ठरतो. नवनवीन संकल्पना मग त्या शैक्षणिक असो किंवा सामाजिक डॉ. समिक्षा निकम मॅडम त्या स्वीकारून त्या अंमलात कशा आणता येतील यावर भर देतात. विद्यार्थीनींचं मनोबल वाढवणं, त्यांना पावलोपावली योग्य ते निर्णय घेण्यात मदत करणं या गोष्टीमुळे विद्यार्थीनींना सुद्धा खूप काही नवीन शिकण्याची , कौशल्य वाढवण्याची संधी मिळते. मुलींचा आत्मविश्वास वाढावा त्या आर्थिदृष्टया स्वावलंबी व्हावात, शैक्षणिक ज्ञानासोबत विविध कौशल्य त्यांना प्राप्त व्हावीत तसचं विद्यार्थीनींचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी त्या कायम प्रयत्नशील असतात. शिक्षण घेवून अनेक पिढ्या समृद्ध करण्याचं, घडविण्याचं काम डॉ समिक्षा निकम आवडीने करत आहेत. प्रत्येक विद्यार्थी स्वतंत्र तेज, बुद्धी आणि वृत्ती जपणारा असतो. हाच कल समजून विद्यार्थीनींमधील सुप्त गुण हेरून त्यांच्या व्यक्तीमत्वाला आकार द्यायचं काम निकम मॅडम करतात. त्यामुळं क्षेत्र कोणतंही असो निकम मॅडमच्या विद्यार्थींनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या ज्ञानाच्या, कौशल्याच्या जोरावर आपल्या उत्तुंग भरारी घेत आहेत. विद्यार्थीनींची प्रगती हिच माझी गुरूदक्षिणा असल्याचं प्राचार्य डॉ. निकम मॅडम अभिमानाने सांगतात.

गुणवत्तेचा आलेख हा प्रेमाच्या नात्यातून उंचावली जात असतो. खरेतर शिक्षण प्रक्रियेत पुस्तके शिकवली जातील, अध्ययन अध्यापनाची प्रक्रिया होईलही. मात्र विद्यार्थीनी व शिक्षक यांच्यातील सेतू नात्याने बांधला जात असतो यावर निकम मॅडम यांचा विश्वास आहे त्यामुळे प्राचार्य भूमिका निभावत असताना विद्यार्थीनी तसचं आपल्या सहकाऱ्यांसोबतचं त्यांचं असलेलं नातं मनाला भावणारं आहे.

(शब्दांकन : पूजा पाटेकर, पवनेश्वर)